**Notice of 37th Annual General Meeting (AGM) and Information of Book Closure and E-voting Facility, published in the Newspapers viz. Navshakti dtd. 6th September, 2018.**

# आशापुरा माइनकेम लिमिटेड


नोंदणीकृत कार्यालय : जीवन उदयोग बिल्डिंग, ३रा मजला, २७८ डि. एन. रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी क्र.: +९१-२२ ६६२२१७०० फॅक्स : +९१-२२ २२०७९३९५/२२०७४४५२

संकेतस्थळ: www.ashapura.com गुंतवणूकदारांसंबधी ई मेल पत्ता: cosec@ashapura.com

कंपनीचा ओळख क्र. : L14108MH1982PLC026396


## ३७व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची, रिमोट ई-मतदानाची व भाग हस्तांतरण बुक बंदची सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की -

१. कंपनीच्या भागधारकांची **३७वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) शुक्रवार, २८ सप्टेंबर, २०१८** रोजी **दुपारी ३.०० वाजता रंगस्वर सभागृह, ४था मजला, वाय.बी.चव्हाण केंद्र, जनरल जगन्नाथ भोसले मार्ग, नरीमन पॉईट, मुंबई - ४०० ०२१** येथे दि. १३ ऑगस्ट, २०१८च्या एजीएमच्या सूचनेमध्ये नमुद केलेले कामकाज हाताळण्याकरीता आयोजित करण्यात येणार आहे.

२. कंपनीचा २०१७-१८ या आर्थिक वर्षाचा वार्षिक अहवाल हा सूचना, संचालकांचा अहवाल, लेखापरिक्षकांचा अहवाल, ३१ मार्च, २०१८ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचे स्वतंत्र व एकत्रित लेखापरिक्षित विवरण, तसेच उपस्थिती प्रत व प्रॉक्सी फॉर्म यासह ज्या भागधारकांनी त्यांचे इमेल पत्ते नोंदविलेले नाहीत त्यांना कुरियरद्वारा ४ सप्टेंबर, २०१८ रोजी पाठविण्यात आलेला आहे व ज्या भागधारकांनी त्यांचे इमेल पत्ते कंपनी / रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजंट यांच्याकडे नोंदविलेले आहेत त्यांना इलेकट्रॉनिक माध्यमातून ६ सप्टेंबर, २०१८ रोजी पाठविण्यात येत आहेत.

३. कंपनी कायदा २०१३ च्या कलम ९१ अन्वये आणि त्या अंतर्गत बनलेल्या व भारतीय प्रतिभूती आणि विनिमय बोर्ड (सूची दायित्वे आणि प्रकटीकरण आवश्यकतांची) नियम, २०१५ (सूची नियम) सोबत वाचल्या जाणा-या नियमानुसार सदस्यांचे नोंदबुक आणि कंपनीचे भाग हस्तांतरण बुक शनिवार, २२ सप्टेंबर, २०१८ पासून शुक्रवार, २८ सप्टेंबर, २०१८ पर्यंत (दोन्ही दिवस अंतर्भूत) एजीएम करीता बंद राहील.

४. कंपनी कायदा २०१३ च्या कलम १०८ व नियम २० (व्यवस्थापन व प्रशासन) नियम, २०१४ च्या अन्वये व वेळोवेळी झालेल्या दुरूस्तीप्रमाणे व सूची नियमांच्या नियम ४४ नुसार कंपनीला कळविण्यास आनंद होत आहे की सदस्यांना ३७व्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये मांडण्यात येणा-या ठरावांवर व हाताळल्या जाणा-या विषयांवर त्यांचा मतदानाचा अधिकार इलेक्ट्रॉनीक माध्यमातून एजीमच्या स्थळा शिवाय म्हणजेच रिमोट ई मतदानाने बजावण्याकरीता ई-मतदानाची सुविधा सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड (सिडिएसएल) दवारे उपलब्ध करून देण्यात येत आहे.

५. रिमोट ई-मतदानाचा कालावधी मंगळवार, २५ सप्टेंबर, २०१८ रोजी सकाळी ९.०० वाजल्यापासून सुरू होऊन गुरूवार, २७ सप्टेंबर, २०१८ रोजी संध्याकाळी ५.०० वाजता संपणार आहे. त्यानंतर सिडिएसएल कडून रिमोट ई-मतदानाचे मॉडयुल बंद केले जाईल.

६. जर एखादी व्यक्ती एजीएमची सूचना पाठविल्या तारखेनंतर आणि २१ सप्टेंबर, २०१८ या कट-ऑफ तारखेपर्यंत कंपनीची भागधारक झाली असेल तर तो भागधारक ई-मतदानाकरीता helpdesk.evoting@cdslindia.com किंवा cosec@ashapura.com या ईमेल पत्त्यावर विनंती पाठवून लॉगिन आयडी व पासवर्ड प्राप्त करून घेऊ शकतो. तसेच, ज्या सदास्यांची भागधारणा डिमॅट स्वरूपात आहे व त्यांनी यापुर्वी www.evotingindia.com या संकेतस्थळावर लॉगिन करून दुस-या एखादया कंपनीसाठी मतदान करताना जो पासवर्ड वापरला असेल तोच पासवर्ड ते वापरू शकतात. तसेच भागधारकाने एकदा त्याचे मत नोंदविले की नंतर त्याला ते बदलण्याची अनुमती दिली जाणार नाही.

७. ज्या व्यक्तीचे नाव सदस्यांच्या नोंदवहीत किंवा डिपॉझिटरीद्वारे तयार केलेल्या लाभधारकांच्या नोंदवहीत कट-ऑफ तारखेपर्यंत असेल तिच व्यक्ती फक्त रिमोट ई-मतदानाची सुविधा वापरू शकते तसेच एजीममध्ये मतपत्रिका वापरून मत नोंदवू शकते.

८. ज्या भागधारकांनी एजीएमच्या पूर्वी रिमोट ई-मतदानाद्वारे त्यांचे मत नोंदविलेले असेल ते सुद्धा एजीएमला उपस्थित राहू शकतात परंतू ते पुन्हा मतदान करू शकणार नाहीत.

९. एजीएममध्ये मतदानपत्रिकेद्वारे मतदान करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. ज्या सदस्यांनी रिमोट ई-मतदानाद्वारे मतदान केले नाही ते सभेमध्ये मतपत्रिकेद्वारे मतदानाचा अधिकार बजावू शकतात.

१०. जर सदस्यांना ई-मतदानासंबंधी काही शंका किंवा प्रश्न असल्यास ते सिडिएसएलच्या www.evotingindia.com या संकेतस्थळावर मदत केंद्रामध्ये उपलब्ध असलेल्या वारंवार विचारल्या जाणा-या प्रश्नांचा ('एफएक्युज') आणि ई-मतदान नियमपुस्तिकेचा संदर्भ घेऊ शकतात किंवा helpdesk.evoting@cdslindia.com या ईमेल पत्त्यावर संपर्क करू शकतात.

११. कंपनीने एजीएममध्ये मतपत्रिकेचे व ई-मतदान प्रक्रियेचे योग्य आणि पारदर्शकरित्या छाननी होण्यासाठी व्यावसायिक कंपनी सचिव श्री. विरेंद्र भट यांची तपासनिक म्हणून नेमणूक केली आहे.

१२. सदस्यांना विनंती करण्यात येते की त्यांनी त्यांचे मत नोंदविण्यापूर्वी ३७व्या एजीएमच्या सूचनेच्या टिपणीमध्ये दिलेल्या सुचना वाचाव्यात. सदर सुचना कंपनीच्या www.ashapura.com या संकेतस्थळावर आणि सिडिएसएलच्या www.evotingindia.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**संचालक मंडळाच्या वतीने**
**सही/-**
**सचिन पोलके**
**कंपनी सचीव व उपाध्यक्ष**

मुंबई
दि. ६ सप्टेंबर, २०१८